कर्नाटकातील मराठी भाषिकांवर अन्याय

महाराष्ट्र उपसभापतींचे कर्नाटक विधानपरिषद सभापतींना पत्र

विधानसभेतून वीर सावरकरांची प्रतिमा हटवण्याच्या निर्णयावरही नाराजी

मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेच्या नुकत्याच पार पडलेल्या विशेष अधिवेशनात महाराष्ट्र आणि कर्नाटक अशा दोन्ही राज्यांच्या सीमा भागातील मराठी भाषिक रहिवाशांवर होत असलेल्या अन्यायाचा मुद्दा सभागृहात मांडण्यात आला. त्याचबरोबर, कर्नाटकातील काँग्रेस सरकारने विधानसभा सभागृहातून स्वातंत्र्यवीर सावरकर यांची प्रतिमा काढून टाकण्याच्या घेतलेल्या निर्णयावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोघांनीही नाराजी व्यक्त केली.

सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी याबाबत कर्नाटक विधान परिषदेचे सभापती बसवराज होर्ती यांना निवेदनाद्वारे विनंती करत नाराजी व्यक्त केली आहे.

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी कर्नाटक विधानपरिषदेचे सभापती बसवराज होर्ती यांना पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अलीकडेच माझ्या निदर्शनास आले की, कर्नाटक सरकार विधानसभेच्या सभागृहातून थोर स्वातंत्र्यसेनानी वीर सावरकर यांची प्रतिमा हटवण्याचा विचार करत आहे. असे झाले तर नक्कीच या देशातील प्रत्येक देशभक्त नागरिकाच्या मनात तीव्र संताप निर्माण होईल. आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे मोठे योगदान आहे, आणि ते कधीही कमी करता येणार नाही, हे वेगळे सांगायला नको.

स्वातंत्र्य चळवळीसाठी आणि देशाच्या कल्याणासाठी त्यांनी आपले संपूर्ण जीवन अर्पण केले, ब्रिटिश साम्राज्याच्या तावडीतून देशाला मुक्त करण्यासाठी त्यांचे प्रयत्न जगभरात ओळखले जातात. विधिमंडळ हे लोकांच्या मनाचे प्रतिबिंब आणि प्रतिनिधित्व करते आणि महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पिठासीन अधिकारी या नात्याने मी लोकांच्या भावना जाणते त्यामुळे, वस्तुस्थिती आणि भावना समोर आणल्यानंतर मला खात्री आहे की तुम्ही या निर्णयावर पूर्ण विचार कराल आणि वीर स्वातंत्र्यवीर सावरकर यांची प्रतिमा कायम कर्नाटक विधानसभा सभागृहाच्या भिंतीवर राहील याची खात्री केली जाईल.

> महाराष्ट्रातले सरकार आणि महाराष्ट्राचे विधिमंडळ हे एकमताने आणि पूर्ण शक्तीने सीमा भागातील आमच्या मराठी बांधवांच्या पाठीशी आहे. ज्याप्रकारे कर्नाटकमध्ये मराठी बांधवांवर अत्याचार होतोय त्याचा निश्चितपणे आम्ही सर्व निषेध करतो. महाराष्ट्राची जनता आणि जगभरातले मराठी माणसं हे त्यांच्या पाठीशी आहेत.सीमाभागातील जनतेच्या शिक्षण, रोजगार, मराठी शाळा, सांस्कृतिक कार्यक्रम याबाबत जी अवहेलना होते, त्याबाबत तुम्ही सरकारची जबाबदारी पार पाडायला हवी.
>
> - डॉ. नीलम गोऱ्हे, विधानपरिषद उपसभापती

शिरोळ नगरपरिषदेचा आराखडा वादात

मुंबई : शिरोळ नगरपरिषदेचा नवीन विकास आराखडा कायदेशीर मुदतीत पूर्ण केला नाही. नगरपरिषदेने कर्तव्यात कसूर केल्याचा दावा करणाऱ्या याचिकेची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली. न्यायमूर्ती अजय गडकरी व न्यायमूर्ती कमल खाटा यांच्या खंडपीठाने राज्य शासन व शिरोळ नगरपरिषदेस नोटीस बजावत याचिकेची सुनावणी जानेवारी मध्ये निश्चित केली आहे.

शिरोळ नगरपरिषद २०१८ साली स्थापन झाली. नवीन शहराच्या हद्द निश्चितीचा नकाशा ३ वर्षात करून प्रारूप विकास आराखडा ३ वर्षाच्या आत शासनास सादर करणे आवश्यक होते. तसेच त्यानंतर महाराष्ट्र नगर रचना अधिनियम कलम २६ प्रमाणे प्रारूप आराखडा २ वर्षात प्रकाशित करण्याचे कायदेशीर बंधन होते. परंतु हद्द निश्चिती अधिसूचना ३ वर्षाच्या मुदतीनंतर व प्रारूप विकास आराखडा सुद्धा विहित २ वर्षाच्या मुदती नंतर म्हणजे सुमारे ३ वर्षानंतर प्रकाशित केला. याला आक्षेप घेत विनोद मुळीक यांच्यासह अन्य रहिवाश्यांनी व इतर नागरिकांनी हरकती नोंदवल्या . मात्र नगररचना अधिकाऱ्यांनी दखल घेतली नसल्याने अखेर अॅड. धैर्यशील सुतार यांच्या मार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

याची दखल घेत खंडपीठाने राज्य शासन व शिरोळ नगरपरिषदेसह, नगरविकास विभाग, संचालक नगर रचना पुणे, यादी प्रतिवादीना नोटीस बजावून याचिकेची सुनावणी जानेवारी २०२५ पर्यंत तहकूब केली.

बांगलादेशातील हिंदूंच्या रक्षणासाठी मुंब्र्यातील मुस्लीम रस्त्यावर

ठाणे : बांगलादेशमध्ये सुरू असलेल्या हिंदूवरील अत्याचाराविरोधात बुधवारी मुंब्रा येथील दारूल फलाह मशिदीसमोर मुस्लीम बांधवांनी निषेध नोंदवत आंदोलन केले. बांगलादेश येथील हिंदू बांधवांच्या रक्षणासाठी केंद्र सरकारने आंतरराष्ट्रीय पातळीवरून बांगलादेश युनिस सरकारवर दबाव आणावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

शेख हसीना यांना सत्तेतून हटवल्यानंतर बांगलादेशात अल्पसंख्य समुदाय, विशेषतः हिंदूंवर हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. नुकतेच हिंदू भिक्षू चिन्मय कृष्ण दास यांना राजद्रोहाच्या खटल्याखाली अटक करण्यात आली. या घटनेनंतर हिंसा मोठ्या प्रमाणात उफाळून आली.

कट्टरपंथीयांनी हिंदूंवर अत्याचार करण्यास सुरूवात केली. यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर संताप व्यक्त होत आहे. या हिंसाचाराचा निषेध करण्यासाठी मौलाना अब्दुल वहाब, मौलाना एहसान, मौलाना अय्याज, शाहरूख सय्यद, कादीर मेमन, सहार युनीस शेख यांच्यासह मुंब्रा - कौसा येथील मौलवी, मुस्लीम बांधवांनी निदर्शने केली. यावेळी 'हिंदू बांधवांचे रक्षण करा' , असे फलक झळकवित आंदोलकांनी बांगलादेश सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. या आंदोलनात मोठ्या संख्येने तरूण, तरूणी, ज्येष्ठ नागरिक, महिला सहभागी झाले होते.

> जिथे जिथे मानवतेच्या विरोधात कृत्य होतील; त्याचा निषेध आम्ही मुंब्रावासीय करणारच आहोत. त्यासाठीच आम्ही येथे उपस्थित आहोत. बांगलादेशामध्ये हिंदू समाजावर आणि अल्पसंख्याक समाजावर अत्याचार होत आहेत. त्यांची मंदिरे, घरे, दुकाने जाळली जात आहेत. तेथील हिंदू महिलांवरही अमानवीय पद्धतीने अत्याचार होत आहेत. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने याची दखल घ्यावी; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवरून उचलून आमच्या हिंदू बांधवांचे रक्षण करावे.
>
> - मौलाना अब्दुल वहाब, नागरिक

मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या प्रमुखपदी रामेश्वर नाईक

मुंबई : मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या प्रमुखपदी डॉ. रामेश्वर नाईक यांची बुधवारी नियुक्ती करण्यात आली. राज्याच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासकीय पातळीवर बदल करताना तत्कालीन कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांना हटवून माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जोरदार दणका दिला.

राज्यातील गरजू रुग्णांना आर्थिक मदत पुरवण्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष महत्त्वाची भूमिका बजावत आहे. देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ साली मुख्यमंत्री झाल्यानंतर या कक्षाची स्थापना केली होती. शिंदे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात देखील प्रभावीपणे काम झाले.

सूचना याद्वारे देण्यात येते की, माझे अशील खाली नमूद **परिशिष्ट अ** मध्ये वर्णन केलेली स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचा प्रस्ताव करीत आहे.

सदर मालमत्ता सध्या श्री. दिनेश देसाई व श्री. मनीष देसाई यांच्या ताब्यात आहे, त्यांच्या पालक श्री. कनक देसाई व सौ. मीनाक्षी देसाई यांच्या निधनानंतर, मा. उच्च न्यायालयाच्या पुरावे आदेशान्वये, वसीयत याचिका क्रमांक २१२/२०२१ अंतर्गत त्यांच्या नावे झाली आहे.

म्हणूनच, कोणीही व्यक्ती विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, भाडेपट्टी, परवाना, उपभोग, विश्वस्त, उत्तराधिकार, भेट, तारण, धारणाधिकार, शुल्क, ताबा किंवा इतर कोणत्याही स्वरूपात सदर मालमत्तेवर हक्क , दावा, नामाधिकार, हित किंवा शुल्क असल्यास, त्यांनी सदर बाबतचे कागदोपत्री पुरावे सोबत जोडून खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात **१४ दिवसांच्या** आत कळवावे. जर अशा स्वरूपाचा कोणताही लेखी आक्षेप वरील मुदतीत प्राप्त झाला नाही, तर सदर मालमत्ता कोणत्याही अडथळ्यांपासून, शुल्कांपासून, भाडेपट्टी, धारणाधिकार, देणी किंवा दाव्यांपासून मुक्त असल्याचे गृहीत धरले जाईल आणि अशा कोणत्याही कथित हक्क किंवा दाव्यांना कायमस्वरूपी त्यागलेले अथवा रद्दबातल मानले जाईल.

परिशिष्ट अ : सुलेमान चेंबर्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड या इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक १४, ४ बॅटरी रोड, अपोलो बंडर, रीगल सिनेमा मागे, कुलाबा, मुंबई-४०००३९, चटई क्षेत्र अंदाजे ७५५ चौ. फुट, तसेच शेअर सर्टिफिकेट क्र. ३६ धारक ५ शेअर्स, विशिष्ट क्रमांक ५६ ते ६० (दोन्ही समाविष्ट).

दिनांक : १२ डिसेंबर २०२४

वकील विवेक शर्मा

पत्ता : राजेंद्र चेंबर्स, २, ग्राउंड फ्लोअर, नानाभाई लेन, फोर्ट, मुंबई- ४००००१.

मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण-II

३रा मजला, टेलिफोन भवन, स्ट्रॅण्ड रोड, कुलाबा, मुंबई-४००००५

मूळ अर्ज क्र. ८० सन २०२४

निशाणी: ११

आयसीआयसीआय बँक लिमिटेड ...अर्जदार

विरुध्द

लक्ष्मीकांत माधवराव नंदनवार ...प्रतिवादी

प्रति,

१. लक्ष्मीकांत माधवराव नंदनवार, प्रौढ, भारतीय रहिवासी, ज्यांचा पत्ता फ्लॅट क्र. १०३, बी२, उन्नती वूडस्, आनंद नगर, कासारवडवली, सारस्वत स्कूल जवळ, ठाणे-४००६१५.

२. करिश्मा एल. नंदनवार, प्रौढ, ज्यांचा पत्ता फ्लॅट क्र. १०३, बी२, उन्नती वूडस्, आनंद नगर, कासारवडवली, सारस्वत स्कूल जवळ, ठाणे-४००६१५. ...प्रतिवादी

समन्स

ज्याअर्थी ओ.ए. क्र. ८० सन २०२४ हा १४/०६/२०२४ रोजी सन्माननीय पीठासिन अधिकारी/ प्रबंधकांसमोर सूचीबद्ध केला होता.

ज्याअर्थी, सन्माननीय न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन रु. २३,०९,६५९/- (रुपये तेवीस लाख नऊ हजार सहाशे एकोणसाठ मात्र) च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या अॅक्टच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओए) समन्स/सूचना जारी केली (जोडलेल्या दस्तावेजांच्या प्रतींसह अर्ज).

ज्याअर्थी साधारण स्वरुपात समन्सची बजावणी परिणामकारक होऊ शकली नाही आणि ज्याअर्थी सन्माननिय न्यायाधिकरणाद्वारे पर्यायी बजावणीकरिता अर्ज संमत करण्यात आला आहे. अॅक्टच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये त्याची समन्सच्या बजावणीच्या ३० (तीस) दिवसांत कारणे दाखविण्यासाठी;

२. मूळ अर्जाच्या अनु. क्र. ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;

३. मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.

४. तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाच्या व्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.

५. व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.

६. तुम्हाला २५/०३/२०२५ रोजी स. ११.०० वा. लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व प्रबंधकांसमोर हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

माझ्या हस्ते आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने सदर ०५ डिसेंबर, २०२४ रोजी दिले.

प्रबंधक

जाहिर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशिल श्री. अनवर अहमद शेख हे मिथिला डेव्हलपर्सचे भागीदार, भारतीय भागीदार अधिनियम, १९४० अन्वये एक नोंदणीकृत भागीदारी संस्था, त्यांचे कार्यालय येथे ५१/५२, तळ मजला, केडी शॉपिंग सेंटर, बेलासिस रोड, मुंबई ४०० ००८, यांनी १७ मूळ भाडेकरू समाविष्टीत इमारतीचा विकास करण्यासाठी भायखळा विभाग 'ई' प्रभाग, आग्रीपाडा चाळ स्ट्रिट, मुंबई - ४००००८ चा सी.एस. ५/१८६५ धारक ''हवा मंझील'' म्हणून ज्ञात इमारत हाती घेतले होता, जे **परिशिष्ट I** मधील बीएमसी/म्हाडा द्वारे मंजूर करण्यात आले, आणि मे. मिथिला डेव्हलपर्सने ''हवा मंझील'' म्हणून ज्ञात इमारतीचा प्रकल्प विकासाकरिता व्यवस्थापन करण्यासाठी सन २०१७ मध्ये श्री. निसार काझी यांच्याशी प्रकल्प व्यवस्थापन करारामध्ये भाग घेतले होते आणि मितेश पटेल माझ्य अशिलांना माहीत नव्हते कारण सदर व्यक्ती निसार काझीकडे कामाला होती आणि माझे अशिल, म्हणजेच श्री. अनवर अहमद शेख यांनी निसार काझीवर विश्वास करून व्यवस्थापनाचे काम दिले होते, परंतु ते दोघेही श्री. निसार काझी काझी आणि मितेश पटेलने श्री. अनवर अहमद शेख यांची फसवणूक केली, आणि त्ययस्थ पक्षकाराकरीता पीएएएच्या नोंदणीच्या संदर्भात बनावट कागदपत्रे तयार केली, जे इमारतीचे जुने भाडेकरू असल्याचा खोटा दावा करत आहेत, परंतु सदर बेकायदेशीर आहेत, आणि त्यांच्या द्वारे म्हणजेच श्री. मितेश पटेल आणि श्री. निसार काझी, बनावट पीएएए नोंदणीकृत केल्या, आणि माझे अशिलाने त्यांच्या विरोधात कायदेशीर कृतीसाठी प्रक्रिया आधीच सुरू केली आहे. मितेश पटेल आणि निसार काझी द्वारे केलेले पीएएएच्या इतर बनावट नोंदणीशी माझ्या अशिलाचा कुठेही संबंध नव्हता आणि माझे अशिल, त्यांच्याद्वारे झालेल्या परिणामांसाठी जबाबदार नाही. सदर नोंदणी कोणत्याही अधिकाराशिवाय करण्यात आली होती, कारण माझ्या अशिलाने मिथिला डेव्हलपर्सच्या वतीने करार नोंदण्यासाठी कोणत्याही व्यक्तिला सदर करीता मुखत्यारी किंवा अधिकार दिलेली नाही.

हे माझ्या अशिलाद्वारे सांगण्यात येत आहे की, श्री. निसार काझी दोन खाती चालवत आहेत ज्यापैकी एक माझ्या अशिलाला माहीत आहे आणि दुसरे माहीत नाही, जे मिथिला डेव्हलपर्सच्या नावे आहे आणि त्यांनी सदर खात्यामधील विविध व्यवहार करून त्रयस्थ पक्षकारासाठी कराराच्या नोंदणीसाठी त्या खात्याचा गैरवापर करण्यात आला. सदर खाते माझे अशिल, म्हणजेच श्री. अनवर अहमद शेख, मे. मिथिला डेव्हलपर्सचे भागीदार, यांच्या मालकीचे आहे आणि सदर ह्या सूचनेच्या प्रसिद्धीनंतर बँक ऑफ बडोदा, भायखळा शाखेत मिथिला डेव्हलपर्सकरीता माझ्या अशिलांच्या मालकीचा खाते क्र. ०३८८०२००००५७१, जे माझे अशिलद्वारे चालवित आहे, ते वगळून दुसरे खाते त्वरित बंद करण्यात येतील.

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत की, माझे अशिल, श्री. अनवर अहमद शेख, मे. मिथिला डेव्हलपर्सचे भागीदार, हे कराराच्या फसवणूक, बनावट आणि खोटे नोंदणीमध्ये कोणत्याही प्रकारे गुंतलेले नाहीत किंवा संबंध नाही, जे श्री. निसार काझी आणि त्यांचे कर्मचारी श्री. मितेश पटेल द्वारे करण्यात आले होते आणि माझे अशिल श्री निसार काझी आणि श्री. मितेश पटेल द्वारे केलेल्या बनावट आणि खोटे कराराच्या नोंदणीच्या आधारावर कोणीही व्यक्तीला झालेल्या नुकसान/दावा करिता जबाबदार नसेल.

दिनांक : ११/१२/२०२४

राजेंद्र राठोड

वकील उच्च न्यायालय

परिशिष्ट-१६

(उपनियम क्र. ३४ अंतर्गत)

सूचना

श्री अंगारा आयतु पूजारी, सदस्य, देवराज सहकारी गृहनिर्माण संस्था लि., पत्ता: एस. व्ही. रोड, गोरेगाव (प.), मुंबई-४००१०४ आणि **दुकान क्रमांक १९, तळ मजला,** संस्थेच्या इमारतीत धारक, यांचे दिनांक १९ मार्च २०११ रोजी निधन झाले आहे, त्यांनी कोणतेही नामनिर्देशन केलेले नाही.

संस्था या माध्यमातून वारस, इतर दावेदार किंवा हरकती करणाऱ्या व्यक्तीकडून १४ दिवसांच्या आत **संबंधित दावे/हरकती मागवते.** या दाव्यांसाठी कागदपत्रे व पुरावे जोडून सादर करावेत, जेणेकरून संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेल्या मृत सदस्याच्या **शेअर्स व हक्कांचे** हस्तांतर करता येईल.

जर वरील कालावधीत कोणतेही दावे/हरकती प्राप्त झाल्या नाहीत, तर संस्था **मृत सदस्याच्या शेअर्स व हक्कांशी संबंधित व्यवहार** संस्थेच्या उपनियमांनुसार करण्यास मोकळी असेल.

प्राप्त दावे/हरकती संस्थेच्या उपनियमांनुसार निकाली काढल्या जातील.

संस्थेचे **नोंदणीकृत उपनियम** पाहण्यासाठी इच्छुक वारस किंवा हरकती करणाऱ्यांना संस्थेच्या कार्यालयात किंवा संस्थेच्या सचिवांकडे **सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.००** या वेळेत पाहता येतील.

संस्थेच्या वतीने,

देवराज सहकारी गृहनिर्माण संस्था लि.

स्थान: मुंबई सही/-

दिनांक: १२ डिसेंबर २०२४ माननीय सचिव

टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंद. पत्ता: ११वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई- ४०० ०१३. **शाखेचा पत्ता:** टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.लोढा आय-थिंक टेक्नो कॅम्पस, ए बिल्डिंग, ४था मजला, पोखरण रोड क्र. २लगत, टीसीएस मागे, ठाणे (प.), मुंबई-४०० ६०७.

शुद्धिपत्रक

दिनांक ११.१२.२०२४ रोजी नवशक्ती या वृत्तपत्रात प्रकाशित स्थावर मिळकतीच्या विक्रीसाठी सूचनेमध्ये अनु. क्र. १२ मधील कर्ज खाते क्रमांक टीसीएचएचएल०२९६०००१०००७४२९५ आणि टीसीएचएचएफ०२९६०००१०००७४२९१ चे कर्जदार / सहकर्जदार यांची नावे **''श्री. दीपक चंद्रकांत कांबळे, सौ. सुलोचना दीपक कांबळे'' ऐवजी ''श्री. दीपक पांडुरंग साळुंखे, सौ. दव्वंती दीपक साळुंखे''** अशी वाचावीत.

इतर नोटीसीमध्ये कोणताही बदल नाही.

दिनांक : १२.१२.२०२४ सही/- प्राधिकृत अधिकारी

ठिकाण : मुंबई टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

ADITYA BIRLA CAPITAL प्रोटेक्टिंग इन्व्हेस्टिंग फायनान्सिंग अँडव्हायझिंग

आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय :-इंडियन रेयन कंपाउंड, वेरावळ, गुजरात -३६२२६६

शाखा कार्यालय : आर-टेक पार्क, १०वा मजला, निर्लोन कॉम्प्लेक्स, वेस्टर्न एक्स्प्रेसवे, गोरेगाव पूर्व मुंबई-४०००६३

परिशिष्ट ४-ए

(सीक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम २००२ च्या नियम ९(१) ची तरतूद पाहा)

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सीक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल असेट्स अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ सहवाचन सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ९(१) च्या तरतूदी अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

सूचना याद्वारे आम जनतेस व विशेषत: कर्जदार, सह-कर्जदार व गहाणवटदार यांना खालील विवरणीत स्थावर मलामत्ता गहाण संबंधात प्रतिभूत धनको यांनी आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटैड यांचे प्राधिकृत अधिकारी यांच्याद्वारे प्रतिभूत धनको यांनी स्थावर मालमत्तेचा ई-लिलाव मार्फत विक्री करून गहाण मालमत्तेची जशी आहे जेथे आहे, जशी आहे जी आहे व जेथे कुठ आहे आधारावर दि. ०३.०१.२०२५ रोजी रक्कम **रु. ५८,८५,५१८.९४/- (रु. अट्ठावन्न लाख पंच्याऐंशी हजार पाचशे अठरा व चौंच्याण्णव पैसे मात्र)** ची वसुलीकरिता थकित रक्कम प्रमुख, एरीअर्स (प्रभारित लेट चार्जेस यांच्यासह) व हितसंबंध **१५.१२.२०२२** अनुसार व पुढील व्याज व अन्य खर्च व खालील विवरणीत मालमत्ता व पुढील प्रभार व मूल्य यांचे खालील कर्जदार, सह-कर्जदार व गहाणवटदार नावे मे. समर्थ डेअरी (त्यांचे प्रोप्रायटर अजिंक्य शिरीषकुमार नाईक, अजिंक्य शिरीषकुमार नाईक व अनेथा अजिंक्य नाईक) यांना पूर्तता करावी.

राखीव मूल्यासह इरठे रक्कम स्थावर मालमत्तेच्या संबंधात खालील अनुसार आहे :

इसारा रक्कम ठेव रक्कम (रु. मध्ये)	राखीव मूल्य (रु. मध्ये)
६,७२,३९०/-	६७,२३,९००/-

प्रतिभूत मालमत्तेचे विवरण :

फ्लॅट क्र १०३-सी, १ ला मजला, ए विंग, रिझर्व बँक स्टाफ, हेमल सीएचएसएल, आझाद नगर, अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सजवळ, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.

विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तीकरिता कृपया प्रतिभूत धनको यांना प्रदानित वेबसाइट अर्थात https://mortagegefinance.adityabirlacapital.com/pages/individual/properties-for-auction-under-sarfaesi-act.aspx or https://sarfaesi.auctiontiger.net वर प्रदानित लिंक पाहावी.

ठिकाण : अंधेरी (पश्चिम) मुंबई **प्राधिकृत अधिकारी**

दिनांक : १२.१२.२०२४ **आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड**

ॲक्सिस बँक लिमिटेड (सीआयएन: एल६५११०जीजे१९९३पीएलसी०२०७६९)

स्ट्रक्चर्ड ॲसेट ग्रुप, कॉर्पोरेट कार्यालय, ७वा मजला, ''ॲक्सिस हाऊस'', सी-२, वाडिया इंटरनॅशनल सेंटर, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - ४०००२५. www.axisbank.com

कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरिता)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(१) सहवाचता जोडपत्र IV नुसार)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी ॲक्सिस बँक लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी म्हणुन सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ सन २००२) (**सरफैसी ॲक्ट**) अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून संदर्भ क्र. ॲक्सिस/एसएजी/जीजे/२०२३-२४/२४४ धारक दिनांक २ ऑगस्ट, २०२३ रोजी सरफैसी ॲक्टच्या कलम १३(२) अन्वये मागणी सूचना जारी करून कर्जदार/हमीदार/गहाणदार म्हणजेच **१. लाईफस्टाईल टेक्नॉलॉजिस प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार आणि जंगमगहाणदार) यांना सूचनेत नमूद रक्कम म्हणजेच** ३०.०६.२०२३ रोजीस थकीत देय असलेले **रु. ५,८०,५८,९९६.७० (रुपये पाच कोटी ऐंशी लाख अठ्ठावन्न हजार नऊशे शहाण्णव आणि सत्तर पैसे मात्र)** त्यासह ०१.०७.२०२३ पासूनचे पुढील व्याज सांपार्श्विक दराने देय आणि प्रत्यक्ष प्रदानाच्या दिनांकापर्यंतचे त्यावरील क्रेडिटच्या निव्वळाची परतफेड आणि **२. श्री. गोपाळ पन्सारी (गहाणवटदार आणि हमीदार) आणि ३. श्रीम. सरिता पन्सारी (गहाणवटदार आणि हमीदार) यांना सूचनेत नमूद रक्कम म्हणजेच रू. ५,२६,५६,२८६.१२/- (रूपये पाच कोटी सव्वीस लाख छपन्न हजार दोनशे शहाऐंशी आणि बारा पैसे मात्र)** ३०.०६.२०२३ रोजीस त्यासह ०१.०७.२०२३ पासूनचे पुढील व्याज सांपार्श्विक दराने देय आणि प्रत्यक्ष प्रदानाच्या दिनांकापर्यंतचे त्यावरील क्रेडिटच्या निव्वळाची परतफेड सदर मागणी सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्यास सांगितले होते.

या खाली नमूद गहाण मिळकतींचे प्रत्यक्ष कब्जा ॲक्सिस बँक लि. द्वारे सरफैसी अधिनियम च्या कलम १४ अन्वये दाखल केलेल्या अर्जावर सन्माननीय मुख्य महानगर दंडाधिकारी, एस्प्लेनेड, मुंबई द्वारे पारित केलेल्या दिनांकित ३ ऑगस्ट, २०२४ रोजीचा आदेशाला अनुसरुन आज म्हणजेच **१० डिसेंबर, २०२४** रोजी सन्माननीय कोर्ट कमिशनर ने घेतला आहे आणि त्यानंतर यामधील खाली विवर्णित गहाण मिळकतीचे प्रत्यक्ष कब्जा ॲक्सिस बँक लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी कडे त्याच दिवशी, म्हणजेच **१० डिसेंबर, २०२४** रोजी रोजी सन्माननीय कोर्ट कमिशनरने सुपुर्द केला.

येथे वरील नमूद कर्जदार/हमीदार/गहाणदार हे सदर रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने कर्जदार/हमीदार/गहाणदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना याद्वारे देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी येथे खाली वर्णन केलेल्या मिळकत/तींचा **प्रत्यक्ष कब्जा** वर नमूद केल्याप्रमाणे सन्माननीय न्यायालयीन आयुक्त यांच्या सहाय्याने सरफैसी ॲक्टच्या कलम १३ चे उप कलम (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये त्यांना प्राप्त अधिकारांचा वापर करून ह्या **१० डिसेंबर, २०२४** रोजी घेतला.

कर्जदार/हमीदार/गहाणवटदार (यामध्ये विशेषकरुन नमूद) आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे ईशारा देण्यात येते की, मिळकतीशी व्यवहार करू नये किंवा या खाली नमूद सदर स्थावर मिळकतीमध्ये कोणत्याही त्रस्थ पक्षकर अधिकार किंवा हितसंबंध निर्माण करू नये आणि मिळकतीशी कोणत्याही व्यवहार संपूर्णपणे प्रदान किंवा वसुली पर्यंत त्यावरील कंत्राट दाराने पुढील व्याज, खर्च, प्रभार, इतर रकमेसह वरील नमूद प्रमाणे आमचे मागणी सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार रकमेसाठी ॲक्सिस बँक लिमिटेडच्या प्रभाराच्या अधीन असेल.

कर्जदार/हमीदार/गहाणदार यांचे लक्ष तारण मत्ता विमोचनासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात सरफैसी ॲक्टच्या कलम १३ च्या पोट-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

स्थावर मिळकतींचे वर्णन

गाळा क्र. जी-२, अपोलो, इंडस्ट्रियल प्रिमायसेस सोसायटी लिमिटेड, महाकाली केव्हज रोड, अंधेरी पूर्व, मुंबई- ४००० ०९३.

दिनांक : -१०.१२.२०२४, ठिकाण: मुंबई **सही/- प्राधिकृत अधिकारी, ॲक्सिस बँक लि.**

फॉर्म क्र. १४ (रेग्युलेशन ३३(२))

द्वारा नोंद. एडी/स्पीड पोस्ट, चिटकवणे, दस्ती

मुंबई येथील कर्ज वसुली अधिकारी क्र.- 2

वित्त मंत्रालय, भारत सरकार,

३रा मजला, एमटीएनएल भवन, स्ट्रॅण्ड रोड, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई ४००००५

मागणी सूचना

**रिकव्हरी ऑफ डेब्टस् ड्यु टु बँक्स अँड फायनान्शिअल इन्